क्र.संगाबाअवि/११/३९२/२०१९
दिनांक - २५/७/२०१९

प्रति,
एम.डी.एस.फॅसीलिटीज,
शॉप नं. ७९/८०, दुसरा मजला,
गुलशन टावर, जयस्तंभ चौक, अमरावती.
मो.नं.२५६९८६७, ९१६८५६११००

विषय :- **सुरक्षा रक्कम सादर करण्याबाबत..**
अभियांत्रिकी विभागात कंत्राटी पद्धतीने इमारत दुरूस्ती/ देखभाल कामे व पाणीपुरवठा विषयक दुरूस्ती/ देखभाल कामाकरीता तांत्रिक कारागीर व मजुर पुरवठा करणे. याकरिता मुदतवाढ देण्याबाबत..

संदर्भ :- १) ई-निविदा सूचना क्र.३/२०१८
Tender Id_SGBAU_273521_1
२) क्र.संगाबाअवि/११/१३८/२०१८ दि.३१/३/२०१८
३) क्र.संगाबाअवि/११/१६७९/२०१९ दि.३०/३/२०१९

महोदय,

उपरोक्त विषयांकीत कामासंबंधी संदर्भांकीत पत्रान्वये आपण सुरक्षा निधी रु.२०,०००/- (रु.वीस हजार फक्त) जमा केलेली असल्याने आपल्या सोबत प्रती प्रती मजुर रु.३५०/-, प्रती प्लंबर रु.४२५/-, प्रती गवंडी रु.४८९.२३ व प्रती सुतार रु.४००/- प्रमाणे पुरवठा करण्याकरीता दिनांक ३१/०३/२०१८ रोजी वार्षिक देखभाल करारनामा करण्यात आलेला आहे.

संदर्भांकित पत्र क्र.३ नुसार करारनाम्याची मुदत संपल्यामुळे तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती. सदर कामाकरिता नवीन कंत्राटदाराची निवड होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

करारनामा नुसार वेळोवेळी संबंधितांकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेप्रमाणे आवश्यक प्लंबर व मजुरांचा पुरवठा करावा.

२४/७/१९
कार्यकारी अभियंता
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रति,
वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

26/7/019

Work-19

85/c

क्र.संगाबाअवि/११/136 A/२०१८
दिनांक 31.3.18

प्रति,

एम.डी.एस.फॅसीलिटीज,
शॉप नं. ७९/८०, दुसरा मजला,
गुलशन टावर, जयस्तंभ चौक, अमरावती.
मो.नं.२५६९८६७, ९१६८५६११००

विषय :- **सुरक्षा रक्कम सादर करण्याबाबत..**
अभियांत्रिकी विभागात कंत्राटी पद्धतीने इमारत दुरूस्ती/ देखभाल कामे व पाणीपुरवठा विषयक दुरूस्ती/ देखभाल कामाकरीता तांत्रिक कारागीर व मजुर पुरवठा करणे.

संदर्भ :- १) ई-निविदा सूचना क्र.३/२०१८
Tender Id_SGBAU_273521_1
२) क्र.संगाबाअवि/११/१३८/२०१८ दि.३१/३/२०१८
३) आपले पत्र

महोदय,

उपरोक्त विषयांकित कामासंबंधी संदर्भांकित पत्रान्वये आपण सुरक्षा निधी रु.२०,०००/- (रु.वीस हजार फक्त) जमा केलेली असल्याने आपल्या सोबत प्रती प्रती मजुर रु.३५०/-, प्रती प्लंबर रु.४२५/-, प्रती गवंडी रु.४८९.२३ व प्रती सुतार रु.४००/- प्रमाणे पुरवठा करण्याकरीता दिनांक ३१/०३/२०१८ रोजी वार्षिक देखभाल करारनामा करण्यात आलेला आहे. तसेच, सदर करारनामा दि.१/०४/२०१८ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील.

तरी, करारनामा नुसार वेळोवेळी संबंधितांकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेप्रमाणे आवश्यक प्लंबर व मजुरांचा पुरवठा करावा.

सहपत्र – करारनामाची झेरॉक्स प्रत

31/3/18
कार्यकारी अभियंता
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रति,
वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

o/c

Work-18

73/c

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2017 ◐ SY 114411

24189
31/3/18
एम. डी. एस. फॅसिलिटीज अमरावती
द्वारा उमेश घारोटे

सौ. एस. एस. मिरानी
मुद्रांक विक्रेता, कॅम्प,
अमरावती ८/९७३-९७

OFFICE OF THE TREASURY OFFICER AMRAVATI
16 MAR 2018

# करारपत्र

हे करारपत्र अमरावती येथे आज दि. ३१/०३/२०१८ रोजी खालीलप्रमाणे दोघांमध्ये करण्यात आलेले आहे.

पार्टी नं :- १ - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती तर्फे
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

पार्टी नं :-२- मे.एम.डी.एस. फॅसिलिटीज, ७९/८० दुसरा माळा, गुलशन टॉवर, जयस्तंभ चौक, अमरावती तर्फे
प्रो.पा.मदन दादाराव साखरे
मे. एम.डी.एस. फॅसिलिटीज, अमरावती

MDS FACILITIES AMRAVATI

ज्याअर्थी अभियांत्रिकी विभागात कंत्राटी पद्धतीने आणि परिस्थितीनुसार कंत्राटी तांत्रिक कारागीर / मजुरांचा पुरवठा करावयाचा आहे. आणि

ज्याअर्थी निविदेसोबतचे जोडपत्रातील कंत्राटी पद्धतीने मजूर पुरवठ्याबाबत नमूद केलेल्या अटी व शर्ती अस्तित्वात आहेत. आणि

ज्याअर्थी विद्यापीठाने त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. संगाबाअवि / ११ / १३८ / २०१८, दि. ३१/०३/२०१८ नुसार कंत्राटी तांत्रिक कारागीर व मजूर पुरवठ्याबाबत निविदा अर्ज स्वीकृत केलेला आहे. आणि

ज्याअर्थी कंत्राट - पार्टी नं.२ ला देण्यात आलेला आहे. आणि

ज्याअर्थी कंत्राटदाराने अभियांत्रिकी विभागात इमारत दुरुस्ती / देखभाल व पाणीपुरवठा दुरुस्ती / देखभाल कामे करण्यासाठी कंत्राटी तांत्रिक कारागीर व मजूर पुरविण्याबाबत मान्य केलेले आहे. आणि

ज्याअर्थी कंत्राटदाराने सुरक्षा ठेव रु. २०,००० /- ( अक्षरी वीस हजार फक्त ) विद्यापीठ खाती अटीनुसार जमा केलेले आहेत.

त्याअर्थी पार्टी नं. १ व पार्टी नं.२ निविदेसोबतच्या अटी व शर्तीनुसार अभियांत्रिकी विभागाला कंत्राटी पद्धतीने तांत्रिक कारागीर / मजूर पुरवठ्याबाबत करारपत्र लिहून देत आहेत.

१) कंत्राटाचा कालावधी कराराच्या तारखेपासून दि. ३१/०३/२०१९ पर्यंत राहील.

२) मला प्राप्त झालेल्या नियुक्तीपत्रातील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या आहेत आणि त्या मला समजल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

३) जर माझ्याकडून एखाद्या अटी / शर्तीचा भंग झाला तर मजूर कंत्राटदार म्हणून माझे करारपत्र रद्द केल्या जाईल,याची मला जाणीव आहे.

४) मी या संदर्भातील सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर जाणीवपूर्वक व स्वच्छेने सदर कंत्राटी काम स्वीकारीत आहे.

५) या कंत्राटी कामानंतर कोणत्याही मजुराला कायम स्वरूपी काम मिळण्याचा हक्क राहणार नाही. तसेच या करारपत्राच्या कालावधीनंतर विद्यापीठावर कोणतीही जवाबदारी राहणार नाही. या कंत्राटी सेवेशी निगडित कोणत्याही प्रकारची मागणी मी करणार नाही. अशी या करारपत्राद्वारे हानी देत आहे.

६) माझे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास, माझी नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल, याबद्दल माझी कुठलीही तक्रार राहणार नाही.

आम्ही ह्या करारपत्रातील सर्व परिच्छेद आणि निविदेसोबतच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून व समजून घेऊन, करार मान्य केल्याबाबत करारपत्रावर स्वाक्षरी करीत आहोत.

MD FACILITIES AMRAVATI

71/c

ठिकाण :- अमरावती

दि.:- ३१/०३/२०१८

स्वाक्षरी :-

पार्टी नं.- १) कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती

साक्षीदार - १) विजय बा. ठाकरे

२) समीर पी. निसंग

MDS FACILITIES

स्वाक्षरी :-

Proprietor

पार्टी नं.- २) कंत्राटदार

मदन दादाराव साखरे

मैं. एम.डी.एस फॅसिलिटीज, ७९/८० दुसरा माळा,

गुलशन टॉवर, जयस्तंभ चौक, अमरावती-४४४७०१

मो.- ९१६८५६११०० फोन- ०७२१-२५६९८६७

MDS FACILITIES AMRAVATI

Executive Engineer
Sant Gadge Baba Amravati University

Registrar
Sant Gadge Baba Amravati University